**फौजदारी किरकोळ अर्ज ९९/२०२५**

**<u>सत्यापन</u>**

मी शपथेवर कथन करतो की,

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | - | सचिन दामोदर बागल |
| वय | - | ४२ वर्षे |
| व्यवसाय | - | वकीली व्यवसाय |
| रहाणार | - | प्लॅट नंबर ३, निकम इमारत, विध्यानगर, भोर, जि. पुणे. |

मी मागील तिन वर्षापासून वर नमूद ठिकाणी कुटूंबासोबत वास्तव्यास आहे. सदरील इमारतीमध्ये माझा प्लॅट हा दुसऱ्या मजल्यावर आहे. त्याच्या वरती म्हणजेच तिसऱ्या मजल्यावर वैभव दत्तात्रय गजभर नावाचा नवीन भाडेकरु राहण्यास आला आहे. सदर व्यक्तीसोबत त्याची पत्नी, त्याचा लहान मुलगा व एक दुरचा नातेवाईक साधारण १८ वर्ष वय असणारा असे राहण्यास आहे.

२. गजभर हे त्यांच्या घरामध्ये दिवसा व रात्री बेरात्री करतात. त्याचा आवाज माझ्या प्लॅटमध्ये येत असतो. गजभर यांच्याकडे असणारा त्यांचा दुरचा नातेवाईक हा सीगरेटचे सेवन करतो व पार्किंगमध्ये माझ्या लावलेल्या दुचाकीवर व चारचाकीचे बसुन तसेच गाडीचे हलवाहलवी करुन नुकसान करतो. मला सदरची बाब समजल्यानंतर त्यावेळी मला गजभर यांच्याकडील नातेवाईक हे करतो हे मला माहित नव्हते. त्यामुळे मी भोर पोलीस स्टेशन येथे अज्ञात इसमाविरुध्द लेखी तक्रार दिली.

३. गजभर कुटूंबिय माझ्या गॅलरीच्या पत्रावर कचरा टाकतात, पार्कींगमध्ये कचरा टाकतात, गच्चीवर पाणी वाहून जाण्यासाठी असणाऱ्या पाईपमध्ये कचरा भरुन तेथे पाणी तुंबवतात. मी त्यांना सदर प्रकाराविषयी तोंडी बोलून समजावण्याचा प्रयत्न केला असता वैभव गजभर याने मानेने इशारा करुन दमदाटी, धमकी व हातवारे केले. सदर आरोपी व त्याचे कुटूंबिय आपसामध्ये आमच्याविषयी चर्चा करुन शिवीगाळ करताना ऐकले आहे.

४. सप्टेंबर २०२५ मध्ये वैभव गजभर व त्याची आई आमच्या घरी आले व मला उददेशुन शिवीगाळ करु लागले. ते म्हणाले की, 'तु काय दादा झालास का '. सदरचा आरोपी हा जाणुनबूजुन असे कृत्य करत आहे जेणेकरुन मी त्याला कोणतीही विचारणा केली की तो त्यावरुन भांडण उपस्थीत करेल. मी दि. २४.१०.२०२५ रोजी त्याच्याविरुध्द भोर पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली आहे. पोलीसांनी तक्रारीवरुन अदखलपात्र गुन्हा क्रमांक ५७५/२०२५ दाखल केला. सदर आरोपी हा मला त्यानंतर देखील उपद्रव व त्रास सातत्याने देत आहे. पोलीसांनी त्याच्याविरुध्द कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सबब सदर आरोपीविरुध्द योग्य ती कारवाई व्हावी.

साक्षीदार
( सचिन दामोदर बागल )

समोर

( एन.के.नागरगोजे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधीकारी, भोर, जि.पुणे

दिनांक ३०.०४.२०२६.